दिनांक १८/०७/२०१८

## जलद संदेश

तक्रारदार यांनी दिनांक १६/०७/२०१८ रोजी पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथे तक्रार दिली की, त्यांचे वडीलांचे नांवे मौजे आटाळा ता.धर्माबाद येथील गट ४३० मधील १ हेक्टर शेत जमीनीचे फेरफार करण्यासाठी तलाठी देवापुरे हे ५०००/- ची लाच मागत असल्याची तक्रार दिली.

सदर तकारीवरून नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दिनांक १८/०७/२०१८ रोजी तलाठी श्री.देवापुरे यांचे धर्माबाद बासर रोडवरील वजन काटा खाजगी कार्यालय परिसरात पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे वडीलांचे नांवे मौजे आटाळा ता.धर्माबाद येथील गट ४३० मधील १ हेक्टर शेत जमीनीचे फेरफार करण्यासाठी तलाठी देवापुरे हयानी ५०००/- रू. ची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २५००/- रू.ची लाच स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यावरून त्यांच्याविरूध्द आज दिनांक १८/०७/२०१८ रोजी तलाठी श्री.देवापुरे यांचे धर्माबाद बासर रोडवरील वजन काटा खाजगी कार्यालय परिसरात सापळा लावला असता तलाठी अनिल शंकरराव देवापुरे वय ४७ वर्षे, व्यवसाय नौकरी तलाठी, नेमणुक तलाठी सज्जा आटाळा ता.धर्माबाद जि.नांदेड मुळ रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी सध्या रा.धर्माबाद यांनी पंचासमक्ष २५००/- रू.ची लाच स्विकारल्याने त्यांचे विरूध्द पोलीस ठाणे धर्माबाद येथे कलम ७, १३ (१) (ड) सह १३(२) भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकीया चालु आहे.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय/अधिकारी कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास व भ्रष्टाचारा संबधाने काही माहिती असल्यास तसेच एखादया शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी अपसंपदा संपादीत केली असल्याची माहिती असल्यास खालील क्रमाकावर संपर्क करावा.

(१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक- १०६४. (२) कार्यालयाचा क्रमांक ०२४६२ २५३५१२

(३) श्री संजय कुलकर्णी, पोलीस उप अधीक्षक, यांचा मोबाईल क्रं. ८५५४८५२९९९.

Website:- www.acbmaharashtra.gov. in,

Mobile App:- www.acbmaharashtra.net

Facebook Page:- www.facebook.

( संजय कुलकर्णी )

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned by CamScanner